<table>
<tr><td rowspan="5">MHGA070004172019</td><td>दाखल दिनांक - ०१.०७.२०१९</td></tr>
<tr><td>नोंदणी दिनांक - ०१.०७.२०१९</td></tr>
<tr><td>निकाल दिनांक - २२.०७.२०२५</td></tr>
<tr><td>कालावधी - वर्षे महिने दिवस</td></tr>
<tr><td>०४ ०० २१</td></tr>
</table>

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय, अहेरी, जि. गडचिरोली यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी श्रीनिवास एच. पांचाळ)

न्यायनिर्णय घोषीत दिनांक – २२ जुलै, २०२६

**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१३२/२०१९) निशाणी क्रमांक– ११ खाली**

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | | महाराष्ट्र शासनातर्फे,<br>पोलीस स्टेशन अहेरी,<br>ता. अहेरी, जि. गडचिरोली.<br>अपराध क्रमांक ५८/२०१९ |
| फिर्यादी पक्षातर्फे | | सरकारी वकील श्री आर.एस. उंदिरवाडे |
| आरोपी | | नारायण पोचु गोमासे,<br>वय-४०, व्यवसाय-मजुरी,<br>रा. आलापल्ली, ता.अहेरी, जि. गडचिरोली |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | वकील श्री. यु.एस. गलबले |

**भाग–ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | ०३/०३/२०१९ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | ०३/०३/२०१९ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | ०१/०७/२०१९ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | १८/१०/२०१९ |

| | | |
|---|---|---|
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | २७/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | २२/०७/२०२६ |
| न्यानिर्णय दिनांक | :- | २२/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | नारायण पोचु गोमासे | ११.०३.२०१९ | १२.०३.२०१९ | महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ कलम ६५ (इ), | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

### अ. फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | रेखा मोतीराम दुर्गे | साक्षीदार | ११ खाली |
| २. | कल्पना पोशालु वेलादी | पंच | ११ खाली |

### क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | ११ | दोषारोप/प्रतिकथन |
| २. | ११ च्या पुढे | आरोपीचे निवेदन |

**न्या य नि र्ण य**

( घोषित दिनांक २२ जुलै, २०२६ )

आरोपी हे मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराधाकरीता सदर खटल्यास सामोरे जात आहेत.

२. **अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

दिनांक ०३/०३/२०१९ रोजी फिर्यादी व ईतर पोलीस कर्मचारी यांच्या सह मौजा आलापल्ली येथे प्रोव्ही रेडकामी गस्त करीत असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आलापल्ली येथील एक इसम नामे नारायण पोचु हा त्याच्या राहत्या घरी अवैध्यरित्या हातभटटी गुळामोहाची दारूची विक्री करत आहे. सदरच्या बातमीवरून फिर्यादीने त्याच्या सहकार्यासह दोन पंचासमक्ष आरोपीच्या घरा समोर जावुन त्याला आवाज दिला असता एक इसम घरा बाहेर आला. पोलीसांना व पंचांचा पाहुन तो ईसम पळुन गेला. सोबत असलेल्या पंचांनी पळुन गेलेल्या ईसमाचे नाव नारायण पोचु गोमासे, रा. आलापल्ली, जि. गडचिरोली असे सांगीतले. सदर आरोपीच्या घराची घर झडती घेतली असता, आरोपीच्या घरी स्वयंपाक खोलीमध्ये दोन काळया रंगाच्या १० लिटर क्षमतेच्या प्लास्टीक कॅनमध्ये १५ लिटर हातभटटी गुळा मोहाची दारू मिळुन आली. म्हणून नमुद आरोपीविरुध्द कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारु बंदी कायदा अन्वये फिर्याद दाखल करण्यात आली. सदर प्रकरणी तपासाचे काम तपासणी अधिकारी पोलीस हवालदार/१२२१ यांनी केलेले आहे. तपासणी अधिकारी पो.स्टे. अहेरी यांनी दोन पंचासमक्ष जप्ती पंचनामा करुन साक्षीदारांचे जाब जवाब नोंदविले आणि सखोल तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

३. सदर प्रकरणी आरोपी हजर झाला असता निशाणी ११ प्रमाणे गुन्ह्याचा तपशील त्यांना मराठीमध्ये वाचून व समजावून सांगणेत आला आणि

त्यांचेविरुध्द मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे अन्वये दोषारोप निश्चित करण्यांत आले. आरोपीने गुन्हा अमान्य करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची समर्थता दर्शविली.

**४.** अभियोग पक्षातर्फे घेणेत आलेल्या साक्षीदाराच्या जबाबाचे अवलोकन केले असता आरोपी विरुध्द सक्षम पुरावा आला नसल्याने आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबानी नोंदविणेत आली नाही. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर.एस. उंदिरवाडे व आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. यु.एस. गलबले यांचा युक्तीवाद ऐकला. वर्दीदारने केलेले कथन, आरोपीने घेतलेला बचाव, अभिलेखावर आलेला पुरावा या सर्व परिस्थितीचा सारासार विचार केला असता खालील बाबी विचाराधीन उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे.

| *अ.क्र.* | *विचाराधीन बाबी* | *निष्कर्ष* |
|---|---|---|
| १. | दिनांक ०३/०३/२०१९ रोजी सायंकाळी ०३.३० वाजताचे दरम्यान मौजा आलापल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली आरोपी हा दारुबंदी गुन्हयातील मुद्येमाल म्हणजेच गावठी गुळामोहाची दारु स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी विना पास परवाना विक्री करीता स्वतःच्या ताब्यात बाळगलेला मिळून आली व त्यानुसार आरोपीविरुध्द मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो का? | नकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

# ***का र ण मि मां सा***

५. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द आरोप सिध्द करण्याकरिता दोन साक्षीदार तपासले आहेत. साक्षीदार क्रं.१ रेखा दुर्गे व घटनास्थळ पंच साक्षीदार क्र.२ कल्पना वेलादी यांची साक्ष निशाणी क्र. ११ खाली नोंदविली आहे.

**विचाराधीन बाबी क्र.१ बाबत –**

६. कल्पना (साक्षीदार क्र.२) हिने सरतपासात असे कथन केले आहे की, तिला दिनांक ०३/०३/२०१९ रोजी पोलीसांनी पंचनाम्यासाठी घटनास्थळी बोलविले नव्हते. पोलीसांनी तिच्यासमक्ष पंचनाम्याची कारवाई केली नव्हती. पोलीसांनी तिच्यासमक्ष कोणताही जप्ती किंवा पंचनामा केला नव्हता. सदर पंचनाम्यातील मजकुर तीला माहीती नाही. तथापी सदर घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावर तीची सही असल्याचे तीने कथन केले आहे. सदरील साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय्य केले नसल्यामुळे साक्षीदारास उलटतपास सदृश्य प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. अभियोगपक्षामार्फत घेण्यात आलेल्या उलटतपासा दरम्यान साक्षीदाराने हि बाब मान्य केली आहे की, त्याचे समक्ष पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातून दारु जप्त केली होती व त्यानंतर जप्तीचा पंचनामा तयार केला होता. आरोपी तर्फे घेण्यात आलेला उलटतपासादरम्यान सदरील साक्षीदार असे कथन करतो की, पोलीसांनी तीच्या सहया पोलीस स्टेशन येथे को–या कागदावर घेतल्या होत्या. एंकदरीत सदरील साक्षीदाराचे वर्तन पाहता, ती विचारलेल्या प्रश्नास होकारार्थी उत्तर देत होती. म्हणून इतर सुसंगत पुरावा असल्याशिवाय, तीचा पुरावा विश्वासार्ह वाटत नाही.

७. अभियोग पक्षाच्या कथनानूसार रेखा दुर्गे ही घटनेची प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. तथापी रेखा दुर्गे (सा.क्र.१) हीने अभियोगपक्षास सहाय्य केलेले नाही. तीला घटनेबाबत काहीही माहीत नसल्याचे कथन करीत आहे. त्यामुळे अभियोग पक्षास साक्षीदाराला उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. तरीही सदरील साक्षीदार तीच्या उपरोक्त कथनावर कायम होती. तीने

तीच्यासमोर आरोपीकडून गुळामोहाची दारू अंदाजे किंमत रु. १५००/– जप्त केली नसल्याचे कथन केलेले आहे. उपरोक्त दोन साक्षीदारा व्यतीरीक्त अभियोग पक्षाने घटनेचा इतर कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासलेला नाही. अभियोग पक्षाने तपासी अधिकारी व फिर्यादीस देखील तपासलेले नाही. अभियोग पक्षाने कल्पना (साक्षीदार क्र.२) हिच्या पुराव्याशी सुसंगत असा पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. म्हणून, तथाकथीत जप्त मुद्येमाल दारु आरोपीच्या ताब्यातून जप्त केले याबाबत शंका तयार होते. तसेच अभियोग पक्षाने या कामात वैज्ञानिक प्रयोग शाळेचा अहवाल सिद्ध केला नाही. सदरील अहवाल हा फौजदारी प्रक्रिया संहीताचे कलम २९३ अन्वये पुराव्यामध्ये स्वीकार्य असतांना देखील, सदरील अहवालास निशाणी क्रमांक देणेबाबत अभियोग पक्षाकडून विनंती देखील करण्यात आलेली नाही. यावरून देखील तथाकथित मुद्देमाल दारू होती किंवा कसे याबद्दल शंका निर्माण होत आहे. अभियोग पक्षामार्फत घेण्यात आलेला पुरावा हा आरोपीविरूध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी पुरेशा नाही.

८. पुरावा कायद्यातील तरतुदी प्रमाणे व मुंबई दारुबंदी कायद्यातील तरतुदी प्रमाणे आरोपी विरुध्दचा गुन्हा शाबीतीच्या दृष्टीने तथाकथीत जप्त मुद्देमाल आरोपीच्याच ताब्यात सापडला व सदरहु मुद्देमाल हा दारुच आहे हे जोपर्यंत सिध्द होत नाही तोपर्यंत आरोपीला शिक्षा होवू शकत नाही. फौजदारी खटल्यामध्ये अभियोग पक्षाने आपला खटला संशयापलीकडे सिध्द करणे आवश्यक असते व तसे करण्यास अभियोग पक्ष या खटल्यामध्ये असमर्थ ठरलेला आहे. वरील सर्व कारणास्तव मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो व मुद्दा क्र.२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

१. आरोपी **नारायण पोचु गोमासे, रा. आलापल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली** याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये मुंबई दारुबंदी अधिनियम कायदा कलम ६५(ई) गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो व जामीनदाराला देखील जामीनातून मुक्त करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल गुळामोहाची दारू पुर्वीच नाश केली असल्यामुळे वेगळा आदेश नाही.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ ची पूर्तता आरोपीने आवाहन याचिकेच्या कामी हजर राहण्याकरिता आरोपीने रक्कम रूपये १५,०००/– चा जामीन कदबा व वैयक्तिक जातमुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by SHRINIVAS HANUMANT PANCHAL
Date: 2026.07.22 15:29:45 +0530

दिनांक २२/०७/२०२६ ( श्रीनिवास एच. पांचाळ)

ठिकाणः अहेरी प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी,

अहेरी.

**प्रमाणपत्र**

मी शपथेवर सांगतो की, पी.डी.एफ. न्यायनिर्णयामधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराप्रमाणे शब्द–न–शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव : ए. वाय. कन्नाके
कनिष्ठ लिपीक (फौजदारी शिरस्तेदार)

न्यायालयाचे नाव : दिवाणी व फौजदारी न्यायालय, अहेरी.

न्यायनिर्णयाची तारीख : २२/०७/२०२६

मा. पिठासीन अधिकारी यांनी
न्यायनिर्णयावर सही केल्याची तारीख : २२/०७/२०२६

न्यायनिर्णया अपलोड केल्याची तारीख : २२/०७/२०२६